MHCH100001002026

दि.कि.अर्ज क्र. ००१/२०२६
विनोद व ३ –वि– कोणीही नाही

## निशाणी क्र.०१ वरील आदेश

(दि. २३ मार्च, २०२६ रोजी अधिघोषीत)

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज १८२७ चे बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट (VIII) चे कलम २ प्रमाणे वारस दाखला मिळणेकरीता दाखल केले आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात असे कथन आहे की, त्रृषीजी लचमन्ना बुक्कावार हे मुल, ता.मुल, जि.चंद्रपूर येथील कायम रहिवाशी होते व ते दि. २२/०५/२०१२ रोजी मृत्यु पावलेले आहेत. (त्रृषीजी लचमन्ना बुक्कावार यांना यापुढे 'मयत त्रृषीजी' असे संबोधण्यात येईल). अर्जदार क्रं.१ विनोद त्रृषीजी बुक्कावार व अर्जदार क्र. २ श्री शैलेन्द्र त्रृषीजी बुक्कावार हे 'मयत त्रृषीजी' यांचे मुलें असून अर्जदार क्र. ३ कल्पना राजु तुम्पल्लीवार अर्जदार क्र. ४ कविता जयंत कत्तुरवार हे 'मयत त्रृषीजी' यांची मुलीं आहेत. सुमनबाई त्रृषीजी बुक्कावार ही 'मयत त्रृषीजी' यांची पत्नी असून ती दिनांक ०३/०२/२०१० रोजी मृत्यु पावलेली आहे. त्यामुळे, अर्जदारांशिवाय 'मयत त्रृषीजी' यांना कोणीही वारस नाहीत.

३. 'मयत त्रृषीजी' यांचे मृत्युपश्चात त्यांचे वारसांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने, अर्जदारांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

४. अर्जदार क्रं.१ त्रृषीजी लचमन्नाजी बुक्कावार यांनी नि.क्रं.१० वर पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन अर्जामधील कथनाप्रमाणे पुरावा सादर

केला व मयत त्रृषीजी लचमन्नाजी बुक्कावार याचे मृत्यू प्रमाणपत्राची पडताळणी प्रत नि.क्र.११ वर दाखल केला, मयत सुमनबाई त्रृषीजी बुक्कावार यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची पडताळणी प्रत नि.क्र. १२ वर दाखल केला, अर्जदार क्र.१ ते ४ चे आधार कार्डची पडताळणी केलेली प्रत नि.क्र. १३ ते १६ वर दाखल केली, दि. २१/०१/२०२६ रोजी चंद्रपूर समाचार वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्याकरीता पैसे भरल्याची पावती नि.क्र. १७ वर दाखल केला आणि दिनांक २२/०१/२०२६ रोजी चंद्रपूर समाचार वृत्तपत्रात प्रकाशीत झालेली जाहिर नोटीशीची प्रत नि.क्रं. १८ अभिलेखावर दाखल केलेले आहेत.

**५.** याकामी अर्जाचे स्वरुप व एकंदर पुरावा पाहता माझेसमोर खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील कारणमिमांसा व निष्कर्षासह खालील प्रमाणे देण्यात आहेत.

| **अ.क्रं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे 'मयत त्रृषीजी' याचे वारस आहेत व असा दाखला मिळण्यास पात्र आहेत काय? | होय |
| २. | आदेश काय? | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र.१ व २ करीता,</u>**

**६.** अर्जदार हे मयताचे वारस असल्याचे अर्जदारांनी शपथपत्रावर कथन केले आहे. अर्जदारांनी जाहीर नोटीस चंद्रपूर समाचार वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द केली आहे. परंतु, त्या जाहीर नोटीशीवर कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. अर्जदार यांच्या शपथपत्रातील कथनावर अविश्वास

ठेवण्यासारखे काही नाही. त्यामुळे अर्जदारांना ते 'मयत त्रृषीजी' याचे वारस असल्याचा दाखला देण्यास कोणताही अडसर नाही. सबब, मी मुद्दा क्रं.१ चे उत्तर होकारार्थी देवुन मुद्दा क्रं.२ करीता पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# **आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्रं.१ ते ४ हे 'मयत त्रृषीजी लचमन्नाजी बुक्कावार' याचे वारस असल्याचे प्रमाणीत करण्यात येत आहे व त्यांचे नावे वारस दाखला देण्यात यावा.

३. अर्जदारांनी नियमाप्रमाणे मुद्रांक शुल्क भरल्यानंतर, वारस दाखला निर्गमीत करण्यात यावा.

SARWARI QADIR AHEMAD NAIMODDIN

Digitally signed by SARWARI QADIR AHEMAD NAIMODDIN
Date: 2026.03.23 15:59:42 +0530

(क्यु.ए.एन.सरवरी)

दि. २३/०३/२०२६

दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
ता.मुल, जि.चंद्रपूर.

<u>Certificate</u>

Certified that PDF copy of judgment supra is word to word identical to the original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Ankit V. Gupta |
| Dictated on | : | 23/03/2026 |
| Checked on | : | 23/03/2026 |
| Signed on | : | 23/03/2026 |
| Uploaded on | : | 23/03/2026 |